# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/05/2023 (शनिवार) सकाळ

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत २० किमी अंतरावर मौजा सुंदरगाव शिवार मौदा येथे दिनांक २६/०५/२०२३ चे २०/१५ वा. ते २१/१० वा. दरम्यान पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ यांना गोपनीय माहीती मिळाली की, काही इसम आपले विना नंबरच्या ट्रॅक्टर ट्रॉली च्या साहाय्याने विनापरवाना व अवैदयरीत्या रेतीची चोरटी वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ यांनी मौजा सुंदरगाव शिवार मौदा येथे नाकाबंदी केली असता, घटनास्थळावर विना नंबरचा ट्रॅक्टर ट्रॉली ही येतांना दिसली. ट्रॅक्टर ट्रॉली च्या चालकाला थांबवून तपासले असता सदर वाहनात चालक नामे– **1) देविलाल बारकु सहारे, वय ४० वर्ष, रा. महादुला** व मालक **२) श्रिहरी वातु थोटे, रा. इजनी ता. मौदा** हे रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून विना नंबरचा शेंदरी रंगाचा ट्रॅक्टर किंमती अंदाजे ७,००,०००/– रु. विना क्रमांकाची शेदरी रंगाची ट्रॉली किंमती अंदाजे १,५०,०००/– रु. व एक ब्रास रेती किंमती अंदाजे ४०००/–रु असा एकुण वाहनासह ८,५४,०००/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलीस नायक दिपक दरोडे ब. नं. ८४३ पोस्टे मौदा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९ भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सोनेकर मो. क्र. ८९७५९२१७७० हे करीत आहे.






## जबरी चोरी

**पो.स्टे. बुट्टीबोरी** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा ईरा चौक बुट्टीबोरी येथे दिनांक २५/०५/२०२३ चे २०.०० वा. ते २०.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— चंद्रशेखर अनंतराव पेंढारकर, वय ५३ वर्ष, रा. प्लॉट नं. ४८ डिम कॉलनी बुट्टीबारी हे आपल्या पानठेल्यावर हजर असतांना आरोपी नामे— १) किशोर गोहने, रा. टाकळघाट २) मारोती गावंडे रा. बुटीबोरी हे अचानक पानठेल्या समोर येवून मुकेश राजपूत याला बोलव असे म्हणुन फिर्यादीचे शर्टचे कॉलर पकडले व विनाकारण झगडा भांडण करुन फिर्यादीचे शर्टचे वरील खिश्याचे पानठेल्यातील मालविक्रीचे असलेले एकुण २८५००/— रु. फिर्यादीच्या शर्टाचा खिसा फाडून हिसकावून चोरुन नेले व शिवीगाळ करुन हातबुक्यांनी मारहाण केली व पैसे हिसकावून पळून गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बुट्टीबोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ठाकुर पो.स्टे. बोरी मो. क्र. ८८८८८६२२५७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**